# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**

phone no 02525-297032,Mo No 8669604078

Address-sp office Bidco Road,Palghar west

E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र.४२ दिनांक १२/०४/२०२१

## पालघर पोलीस दलाकडुन, ०४ ठिकाणी रक्तदान शिबीराचे आयोजन करुन १०७० रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.

संपुर्ण महाराष्ट्रात कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव प्रचंड वाढलेला आहे. कोव्हीड -१९ मुळे राज्यभरात रक्ताचा तुटवडा निर्माण झालेला आहे. त्याअनुषंगाने मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग, श्री.शैलेश काळे, पोलीस उपअधीक्षक,गृह यांचे मार्गदर्शनाखाली वाडा पोलीस ठाणे येथे पालघर पोलीस दल यांच्या विद्यमाने, पतंगशहा कुटीर रुग्णालय रक्तपेढी जव्हार जिल्हा पालघर व जे.जे. हॉस्पीटल रक्तपेढी, मुंबई या शासकीय रक्तपेढीच्या वतीने सकाळी १०.०० ते १८.०० वाजेपर्यंत महारक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

कासा, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी पोलीस ठाणे परिसरातील पोलीस मित्र, पोलीस पाटील, ग्रामरक्षक दल, सागर रक्षक दल व नागरींकांमध्ये मोठया प्रमाणात जनजागृती करुन नागरीकांना रक्तदानाचे महत्व पटवुन दिले होते. त्यामुळे दिनांक १०/०४/२०२१ रोजी कासा, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा पोलीस ठाणे परीसरातील तरुण वर्ग व महीलांनी मोठया प्रमाणात रक्तदान शिबिरास प्रतिसाद देवुन वाडा येथे मोठया संख्येने उपस्थीती दर्शवीली होती. रक्तदात्यामध्ये कासा, वाडा, विक्रमगड, जव्हार, मोखाडा पोलीस ठाणे येथील पुरुष व महीला पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच होमगार्ड, पोलीस पाटील, ग्रामरक्षक दल, सागर रक्षक दल व नागरीक यांनी या कार्यक्रमास हजेरी लावुन १५६ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.

**तसेच पालघर पोलीस दलातर्फे ०४ ठिकाणी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.**

१) दिनांक ०४/०४/२०२१ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर यांचे वतीने लायन्स क्लब, पालघर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करनण्यात आले होते. तरी २०२ रक्तदात्यांनी रक्तदान करुन सहकार्य केले आहे.

२) दिनांक ०६/०४/२०२१ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर यांचे वतीने टीमा हॉल, बोईसर येथे ४०४ रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे.

३)दिनांक ०८/०४/२०२१ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, डहाणु यांच`वतीने दशश्री माळी समाज हॉल,मासोली, ता.डहाणु येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. याठिकाणी ३०८ रक्तदात्यांनी रक्तदात्यांनी रक्तदान केले आहे

४)दिनांक १०/०४/२०२१ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार यांचे वतीने वाडा पोलीस ठाणे येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करुन १५६ रक्तदात्यांनी रक्तदान करुन सहकार्य केले आहे..

पालघर पोलीस दलाच्या वतीने ०४ ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये एकुण १,०७०/- रक्तदात्यांनी रक्तदान करुन सहकार्य केले आहे.

पालघर पोलीस दलाकडुन मा.श्री.दत्तात्रय शिंदे, पोलीस अधीक्षक, पालघर, मा.श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री.प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग, श्री.शैलेश काळे, पोलीस उपअधीक्षक,गृह, श्री. विकास नाईक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पालघर विभाग, श्री. विश्वास वळवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग, श्री.धनाजी नलावडे, उपविभागीय पोलीस अधिकारी, डहाणु विभाग यांनी तसेच पालघर पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचेवतीने रक्तदांत्याचे आभार मानले आहेत.